# अफगाणिस्तान

## चन्द्रशेखर पुरन्दरे

अफगाणिस्तानात सत्तांतर झाले. अमेरिकेने अधिकृतरित्या अफगाणिस्तान सोडण्याची घोषणा यावर्षीच्या १४ एप्रिलला केली. त्यानुसार याच वर्षी १ मे ते ११ सप्टेंबरपर्यंत अमेरिकन्स संपूर्ण देश सोडणार असे जाहीर झाले. [११ सप्टेंबर २००१ ला अमेरिकेवरच्या अल कइदाच्या हल्ल्याला वीस वर्षे झाल्यावर]. घोषणेनंतर महिन्याभरातच ४ मे पासून तालिबानने एकामागून एक शहरे काबीज केली आणि शेवटी १५ ऑगस्टला काबूल ही देशाची राजधानी ताब्यात घेतली. बहुतेक ठिकाणी त्यांना सरकारी फौजांचा विरोध झालाच नाही. अवघ्या काही आठवड्यातच तालिबानने देश ताब्यात घेतला. आता उत्तरेचा पंजशीर प्रांत फक्त त्यांच्या अंमलाखाली नाही.

सगळे अमेरिकन बाहेर पडेपर्यंत काबूल आंतरराष्ट्रीय विमानतळ अमेरिकन लष्कराच्या ताब्यात आहे. त्यामुळे अंगावरच्या कपड्यनिशी देश सोडून जाऊ इच्छिणाऱ्या सामान्य अफगाणांनी विमानतळावर प्रचंड झुंबड उठवली. दिसेल त्या विमानात जाण्याचा प्रयत्न केला, धावपट्टीवर बसून विमानाचे उड्डाण रोखण्याचा प्रयत्न केला, काहीजण टपावर चढले, काही शिड्यांना लटकले, त्यात विमान सुटल्यावर खाली पडून किमान दोघे मरणही पावले. आणखी तिघे सैनिकांनी केलेल्या गोळीबारात. अफगाणिस्तानातील नवे पर्व असे सुरू झाले.

अफगाणिस्तानातील मुस्लिम आतंकवादी नष्ट करणे, तेथे लोकशाही आणणे, देशाचे सैन्य आधुनिक करणे वगैरे अनेक उद्दिष्टे अमेरिकेने आक्रमणाच्या वेळी जाहीर केली होती. ती सगळी असफल झाली. २० वर्षे, ८३ बिलियन डॉलर्स फक्त सैन्याच्या आधुनिकीकरणावर व एकूण ३ ट्रिलिअन डॉलर्स खर्च, दोन अडीच हजार अमेरिकन सैनिकांचे मरण, किती अफगाण बळी पडले याची मोजदादही नाही. अशा या प्रकल्पाची दृश्य फलश्रुती काय तर अफगाणिस्तानचा राष्ट्राध्यक्ष काबूल पडते आहे हे दिसताच देश सोडून पळून गेला. जाताना, रशियन वृत्तसंस्थेनुसार चार मोटारी आणि एक हेलिकॉप्टर भरून रोख चलन घेऊन त्याने पलायन केले. ही लोकशाहीची परिस्थिती. नंतर मध्यवर्ती बँकेचा अध्यक्षही पळून गेला. ही नोकरशाहीची अवस्था. अफगाण सैन्य तर पत्त्याच्या बंगल्याप्रमाणे कोसळले. ही लष्कराची दैना.

तालिबानच्या आधीच्या राजवटीचा अनुभव आश्वासक नाही. शरिया कायद्यानुसार देश चालवणे हा त्यांचा घोषित एक कलमी कार्यक्रम आहे. त्यानुसार पहिले लक्ष्य स्त्रिया. बाकी काही नाही, तरी स्त्रियांची परिस्थिती या वीस वर्षांत सुधारली. मुलींना शाळेत जायला परवानगी मिळाली, उच्चशिक्षण शक्य होऊन अनेक स्त्रिया व्यावसायिक क्षेत्रात गेल्या - डॉक्टर, नर्स, वकील, शिक्षिका, पत्रकार वगैरे. तालिबानचा पुनर्जन्म होताना शेकड्यात स्त्रियांनी पत्रकारिता मागच्या वर्षांपासून सोडून दिली कारण त्यांना वेचून ठार मारणे सुरू झाले होते. तालिबानच्या आधीच्या काळात शाळा, कॉलेजे सोडाच, स्त्रियांना नातेवाईक पुरुष बरोबर असल्याखेरीज घराबाहेर जाण्याचीही परवानगी नव्हती. सत्तेवर आल्या आल्या तरी तालिबानचा पवित्रा स्त्रियांबाबत जरा मवाळ दिसतो. त्यांना शिक्षणासाठी, कामासाठी घराबाहेर जायला तालिबान आड येणार नाही असे त्यांचे प्रवक्ते आता म्हणत आहेत. त्यांना बुरखा मात्र वापरायला लागेल कारण इस्लाम तसे सांगतो, इतपतच आताचा आग्रह. पुढे किती अधिक जाचक निर्बंध येतील हे आज सांगणे कठीण आहे. पण ज्या स्त्रियांनी आधीच्या राजवटीचा अनुभव घेतला आहे, त्यांना तालिबान वीस वर्षात मूलत: बदलले असेल असे वाटत नाही.

याखेरीज, एकूण दमनकारी जहाल धार्मिक वातावरण, साध्या गुन्ह्यासाठी हात तोडणे, सार्वजनिक ठिकाणी दगडांनी ठेचणे, वगैरे मध्ययुगीन शिक्षा तेव्हा अंमलात होत्या. या सगळ्याच्या भीतीने लोक पळून जायला पाहत होते. शिवाय अफगाणिस्तानातील उझबेक, ताजिकी, पश्तून, हाजरा इत्यादी जमातींचे परस्परांशी असणारे तणाव तीव्र होण्याची शक्यता आहे. परिणामत: बऱ्याच पाश्चात्त्य देशांनी या सरकारला मान्यता दिलेली नाही.

अफगाणिस्तानचे भौगोलिक स्थान पहाता मध्य आशिया आणि उर्वरित आशिया यांच्या दृष्टीने तो देश महत्त्वाचा आहे. तो देश खनिजांनीही [तांबे, लोह, कोळसा, इ.] समृद्ध आहे.

म्हणून रशिया, भारत, चीन या शेजारी देशांना तेथील सरकार अनुकूल हवे आहे. चीनने तालिबानबरोबर वाटाघाटी सुरु केल्याही आहेत.त्याची व्यापारी गुंतवणूक आहे आणि Belt and Road Initiative या त्याच्या जागतिक महत्त्वाकांक्षी प्रकल्पात अफगाणिस्तानला महत्त्व आहे. तसेच मुस्लिम आतंकवाद आपल्या देशात येऊ नये हाही चीनचा उद्देश आहे.

पाकिस्तानमध्ये तालिबानच्या आगमनाचे स्वागत पंतप्रधानां-पासून खालपर्यंत झाले. इम्रान खानच्या शब्दात अफगाणिस्तान अमेरिकेच्या जोखडातून बाहेर पडला. मुळात तालिबान पाकिस्तानची निर्मिती आणि संवर्धन. त्यामुळे ही प्रतिक्रिया. पण हा भस्मासुर उद्या पाकिस्तानच्याच शिरावर हात ठेवेल हे सार्वत्रिक भान दिसत नाही. कारण धार्मिक उन्माद आणि अमेरिकाद्वेष. तुरळक तज्ञ तो इशारा देत आहेत. आतंकवाद हा निर्याती माल असल्याने शेजारच्या सर्वच राष्ट्रांना तो धोका आहे. व्यापारी हितसंबंध कितीही दृढ झाले तरी ते मूलतत्त्ववादाला आळा घालू शकत नाहीत. उदा. सौदी अरेबिया आणि अमेरिकेचे घनिष्ठ आर्थिक संबंध हे तर अल कइदाच्या अमेरिकाद्वेषाचे प्रमुख कारण होते. ११ सप्टेंबरच्या अमेरिकेवरील हल्ल्यातील १९ हल्लेखोरात १५ सौदी अरेबियन होते. त्यात पाकिस्तान स्वत:च पोखरलेले राष्ट्र आहे. तेथे लष्करावर निर्वाचित सरकारचे नियंत्रण नाही.आजवर पाकिस्तानी लष्कर तालिबानला जेमतेम आटोक्यात ठेवत असे याचा अर्थ उद्या तसे नियंत्रण राहिलच असे नाही. मुस्लिम मूलतत्त्ववाद फैलावेल. शेजारी काश्मीर व भारत.

आताच्या तालिबानने याबाबत भूमिका स्पष्ट केली आहे की विदेशी आतंकवादी मुस्लिमांना अफगाण भूमीवर थारा नाही. पण इस्लामिक स्टेट, जएश-ए-महम्मद आणि लष्कर-ए-तइबा संघटनांनी एव्हाना शिरकाव केलाच आहे अशा बातम्या आहेत. तालिबानचे धोरण न जुमानता हे गट त्यांच्या स्वत:च्या हिंसक कारवाया परदेशी पाठिंब्यावर करण्याची शक्यता आहे.

चीन व पाकिस्तान सोडता, उर्वरित जगाला ही मोठीच धक्का-दायक प्रक्रिया आहे. ती दिसते तशी रातोरात झाली नाही. त्यामागे अनेक गुंतागुंतीचे घटक आहेत. सामाजिक प्रश्नांना लष्करी व तंत्र-ज्ञानावर आधारित उत्तरे लादणे, लोकांना काय हवे याकडे दुर्लक्ष करणे, प्रभुत्ववाद, धार्मिक मूलतत्त्ववाद, इत्यादी. ते घटक पाहू म्हणजे अफगाणिस्तानची सद्यस्थिती आणि भविष्यासाठी त्याचे संकेत स्पष्ट व्हावेत.

पहिला मुद्दा सामाजिक प्रश्नांचा. पाश्चात्त्य ज्ञानव्यवस्थेचा अविभाज्य समज असा आहे की सामाजिक प्रश्नांना तंत्रज्ञानावर आधारित, व्यवस्थापकीय [managerial] उत्तरे देता येतात. त्यात तंत्रज्ञानाला आधुनिक, अत्याधुनिक लष्करी मदत मिळाली तर सगळ्या सामाजिक प्रश्नांवर इलाज होऊ शकतो. तो भ्रमाचा भोपळा अफगाणिस्तानने फोडला आहे. अमेरिकेने अत्याधुनिक लष्करी आधिपत्यावर आधारित सामाजिक परिवर्तनाचे 'वरून खाली' imported models लादण्याचे प्रयत्न केले. तिथल्या लोकांची परंपराच नाकारली. निर्वाचित लोकशाहीचा प्रयोग केला. आता, तालिबानने 'येथे लोकशाही व्यवस्था नसेल कारण ती आमची परंपरा नाही' हे स्पष्ट शब्दात जाहीर केले आहे. तालिबानची एक कौन्सिल देश चालवेल.

पुढचा मुद्दा म्हणजे लोकांना काय हवे. निर्वाचित लोकशाहीचे गृहीत असे की लोकांना काय हवे ते मतदानावरून कळते. अमुक पक्षाच्या कार्यक्रमावरून लोक त्या पक्षाला मते देतात. पण मग ट्रम्पसारखे नेतृत्व लोकशाही उदयाला आणते. धार्मिक मूलतत्त्ववाद तेवढाही देखावा करत नाही. मूठभर धर्मतज्ज्ञ हिंसेच्या ताकदीवर संपूर्ण समाज कोणत्या दिशेने जावा ते ठरवतात आणि विरोधाला बंदी असते, त्यातून विरोध झालाच तर विरोधकांना धार्मिक न्यायाने ठारही मारले जाते. जेव्हा अफगाण युद्ध सुरू झाले तेव्हा बहुसंख्य अमेरिकनांचा आणि अमेरिकेच्या साथीला असणाऱ्या काही युरोपिअनांचा त्याला पाठिंबा होता. त्या भरवशावर लोकशाही मार्गाने निवडून आलेल्या नेतृत्वाने युद्ध सुरू केले. ते काही महिन्यांतच संपले व तालिबानचा पाडाव झाला. त्यानंतर अफगाणिस्तानात परत आतंकवादी शक्ती उभ्या राहू नयेत म्हणून तेथे रहाणे आवश्यक असा युक्तिवाद या नेतृत्वाने त्यांच्या लोकांपुढे मांडला व अमेरिका आणि युरोपिअन देश तेथे राहिले. या दोन्ही प्रसंगांवरून स्थानिक [अमेरिकन व युरोपिअन] लोकशाहीची दिशा प्रत्येक वेळी बृहत जगासाठी श्रेयस्कर असतेच असे नाही हे दिसते.

त्याबरोबरच तालिबानची स्वनियुक्त कौन्सिलही लोकांना काय हवे हे विचारात घेत नाही हे लक्षणीय.

मे २०११ला अमेरिकेने अल कइदाचा प्रमुख बिन लादेन याची पाकिस्तानात हत्या केली. मागील एका लेखात म्हटल्याप्रमाणे, २०११ नंतर अमेरिकेचे अफगाणिस्तानातील वास्तव्यच अनावश्यक होते. गेल्या दहा वर्षात अमेरिकेविरुद्ध भूमिका

**(पान २५ वर)**

(जगभर: पान २१ वरून)
घेणाऱ्या शक्तींना बळ आले. तालिबानचा आश्चर्यकारक विजय केवळ त्यांच्या लष्करी दहशतीमुळे झाला असा पाश्चात्त्य मीडियाचा आजचा निष्कर्ष व प्रचार तितका बरोबर नसावा.

आता प्रभुत्ववाद [त्याला कालपर्यंत साम्राज्यवाद म्हटले जाई!] २००१ मधील हल्ल्यानंतर अल कइदाला आश्रय देणाऱ्या अफगाणिस्तानच्या तालिबानी राजवटीविरुद्ध अमेरिकेने युद्ध सुरू केले. वस्तुत: नंतर प्रकाशात आलेल्या माहितीनुसार, अल कइदाला तालिबानचा पाठिंबा नव्हता. किंबहुना या आगंतुकांना कसे आवरायचे हा तालिबान पुढे पेच होता. तो त्यांनी पाकिस्तानच्या निदर्शनासही आणला होता. पण त्याकडे पाकिस्तानने व अमेरिकेने दुर्लक्ष केले.

एक दुबळा देश हल्ला करायला सोपा म्हणून अमेरिकेने हे युद्ध अफगाणिस्तानवर लादले. त्यात पश्चिमेतील अमुस्लिमांच्या मुस्लिमद्वेषाची जनमान्यता, Twin Towers च्या घटनेवर दृश्य आक्रमक प्रतिक्रिया करण्याची राजकीय गरजही होती. या भूमिकेच्या मागे पाश्चात्त्य भांडवलशाही लोकशाही व्यवस्था ही जगातील सर्वश्रेष्ठ व्यवस्था आहे हे गृहीत होते. ती व्यवस्था जगभर आणणे हे आपले स्वयंसिद्ध कर्तव्य आहे, ही अहंकारी भूमिका हा या संदर्भातील प्रभुत्ववाद.

धार्मिक मूलतत्त्ववाद याच दिशेला जातो. आमचा धर्म हा सर्वश्रेष्ठ धर्म. त्याचे अनुकरण आम्ही सांगतो तसेच व्हायला हवे अन्यथा अश्रद्धांना देहदंड देणे हे ईश्वरमान्य कर्तव्य आहे आणि ते आम्ही [श्रद्धावन्त] पाळू अल कइदा आणि तालेबानची ही श्रद्धा आहे.

म्हणजे, अफगाणिस्तानातील संघर्ष हा या दोन विचारसरणीतील संघर्ष आहे.

दुसऱ्या शब्दात हा संघर्ष चिरंतन आहे. जोपर्यंत संपूर्ण मानवजात आपल्या अधिपत्याखाली येत नाही, तोपर्यंत आपली विचारसरणी पुढे रेटणे हा दोन्ही बाजूंचा अजेंडा आहे. अफगाणिस्तान हे निमित्त आहे, ते एक उदाहरण म्हणून आज जगापुढे आले आहे.

दोन्ही विचारसरणींच्या संकुचितपणाबद्दल लोकांची जाणीव वाढणे/वाढवणे हा एक मार्ग आहे. त्याने हा संघर्ष अल्पजीवी ठरेल.

purandarearts.com
art-non-deco.com
artnondeco@yahoo.co.uk